डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णावर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार

दि.३ मार्च ते ८ मार्च २०२५ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.

संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१४६ ■ बुधवार ५ मार्च २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

उत्कृष्ट क्वालिटी

साबुदाणा ५५ रु.किलो
शेंगदाणे १०० रु.किलो
सेंद्रिय गुळ ५० रु.किलो

सागर ड्रायफ्रुट

पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

धनंजय मुंडे यांचा अखेर मंत्रिपदाचा राजीनामा

देशमुख हत्या प्रकरण नडले : राज्यपालांनी केले कार्यमुक्त

मुंबई, दि.४- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्यावरील अत्याचाराचे फोटो व्हायरल झाल्यानंतर एकच संतापजनक लाट उसळली होती. यानंतर मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत असतांना अखेर धनंजय मुंडे यांनी मंगळवारी सकाळी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. मुंडेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राजीनामा दिला होता. तो मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वीकारला आहे.

नऊ डिसेंबर २०२४ रोजी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची वाल्मिक कराडच्या टोळीने खंडणीच्या प्रकरणातून हत्या केली होती. याप्रकरणी वाल्मिक कराडसह आठ जणांना अटक करण्यात आली. पण, वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय असल्याने त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सातत्याने होत होती. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सीआयडीने आरोपपत्र दाखल केले आहे. यातच संतोष देशमुख यांना मारहाण केल्याचे आरोपपत्रातील फोटो बाहेर आले होते. हे फोटो पाहून राज्यात एकच हळहळ व्यक्त केली जात होती. यानंतर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, या मागणीने जोर धरला होता. सोमवारी मध्यरात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, धनंजय मुंडे, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनील तटकरे यांच्यात बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंडेंना राजीनामा द्यावा, असे आदेश दिले होते. अखेर मंगळवारी धनंजय मुंडेंच्या स्वीय **(पान ४ वर)**

आता खोदून खोदून गोष्टी बाहेर काढणार : दमानियांचा इशारा

बीड, दि.४- अखेर अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. या राजीनाम्यानंतर आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आता तर मी आणखी गोष्टी खोदून काढणार असल्याचा इशारा दिला आहे.

दमानिया म्हणाल्या, राजीनामा दोन महिन्यांपूर्वीच घ्यायला हवा होता. पण आता मी गोष्टी खोदून खोदून काढणार आहे. खंडणीची बैठक धनंजय मुंडे यांच्या सातपुडा या शासकीय निवासस्थानी झाली होती. तिथले आता टॉवर लोकेशन काढून मी आता हा विषय पुढे नेणार आहे, असे दमानिया यांनी सांगितले.

दमानिया यांना अश्रू अनावर

संतोष **(पान ४ वर)**

टीम इंडियाची थेट फायनलमध्ये धडक

दुबई, दि.३- रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीची अंतिम फेरी गाठण्याचा पराक्रम गाजवला. दुबईतल्या उपांत्य सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा ४ विकेट्सनी पराभव केला. भारताच्या या विजयात फलंदाज आणि गोलंदाजांनीही आपला ठसा उमटवला. या सामन्यात भारतीय फलंदाजांनी विजयासाठीचे २६५ धावांचे लक्ष्य गाठले. भारताकडून विजयी लक्ष्याच्या पाठलागात विराट कोहलीने मोलाची भूमिका बजावली. त्याने श्रेयस अय्यरच्या साथीने ९१ **(पान २ वर)**

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.वर्षा लहाडे यांची अखेर झाली बदली

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी) - वादग्रस्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.वर्षा लहाडे यांची अखेर धरणगाव येथे बदली करण्यात आल्याने डाक्टर, परिचारिका तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

डॉ.लहाडे यांनी आर्थिक भ्रष्टाचारसह मनमानी कारभार सुरु केला होता. यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.अधिकाऱ्यांना दुय्यम वागणूक, प्रत्येक बाबतीत आर्थिक व्यवहार करणे, कर्मचाऱ्यांना अरेरावीची भाषा वापरणे. या त्रासास कंटाळून मेग्मो संघटना, डॉक्टर संघटना, परिचारिका संघटना तसेच विविध आदिवासी संघटनांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या विरोधात वरिष्ठ पातळीवर तक्रारी केल्या होत्या. गेल्या महिनाभर विविध आदिवासी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर आंदोलन केले. शेवटी वैद्यकीय अधिकारी व आदिवासी संघटनांच्या आंदोलनाला यश आले असून जिल्हा चिकित्सक डॉ वर्षा लहाडे यांची जळगाव जिल्हयातील धरणगाव येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे.

डॉ.वर्षा लहाडे यांच्याविरुध्द चौकशी समिती नेमण्यात आली होती.डॉ.वर्षा लहाडे यांचेविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने डॉ.योगेश चित्ते, सहायक संचालक (वैद्यकीय) आरोग्य सेवा, नाशिक यांचे **(पान ४ वर)**

बाल संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल धुळ्याचे एसपी, जि.प.सीईओ यांचा मुंबईत गौरव

धुळे, दि.४- बाल संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबाबत धुळे जिल्ह्यास चार बालस्नेही पुरस्कार प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, उत्कृष्ट जिल्हा महिला व बालविकास कार्यालय बालसक्षेही पुरस्कार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाचे गिरीश जाधव आणि कर्मचारी तसेच उत्कृष्ट बाल कल्याण समिती बालसक्षेही पुरस्कार धुळे समितीच्या अध्यक्षा डॉ.उषा साळुंखे आणि सहकारी यांना प्राप्त झाला आहे. या सर्वांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याबद्दल सर्व संबंधितांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

बाल संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबाबत राज्यातील अधिकारी आणि यंत्रणांचा सन्मान करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्यावतीने बाल स्नेही पुरस्कार २०२४ समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री पंकज भोयर, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शाह, आमदार संजय केळकर, आमदार मनीषा कायंदे, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग पोलीस अपर महासंचालक अश्वती दोर्जे, आयोगाचे माजी आयुक्त प्रशांत नारनवरे, आयोगाचे सचिव लक्ष्मण राऊत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. अवर सचिव वंदना जैन, शिक्षण अधिकारी माधुरी भोसले, सदस्य नीलिमा चव्हाण, जयश्री पालवे, सायली पालखेडकर, संजय सिंगल, चैतन्य पुरंदरे, आदिंसह जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिकारी, विभागीय उपायुक्त, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बालकांसाठी आयोगाच्या विविध उपक्रमात आपला सक्रिय सहभाग व मौलिक योगदानाबाबत खासगी स्वयंसेवी संस्थानाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट जिल्हाधिकारी, उत्कृष्ट विशेषगृह, उत्कृष्ट स्वयंप्रेरणेने सुरक्षिततेसाठी राबविलेले उपक्रम, उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी, उत्कृष्ट विशेष दत्तक एजन्सी, **(पान ४ वर)**

मांडोळे कुटुंबियांचा परिसरातील नागरिकांकडून छळ तक्रार देवूनही पोलीसांकडून दुर्लक्ष झाल्याचा आरोप

धुळे, दि.४- शहरातील देवपूर कदमबांडे नगरातील रहिवासी प्रभुलाल ज्ञानेश्वर मांडोळे यांच्या घराजवळील राहणाऱ्या नागरिकांनी अर्वाच्य भाषा वापरत त्यांच्या जवळील अकरा हजार आठशे ऐंशी रूपयांचा रोख रक्कम हिसकावून नेली. जबर मारहाण करत पेट्रोल टाकून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनला दि.६ फेब्रुवारी २०२५ रोजी तक्रार दाखल करण्यात आली. परंतु पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनचे पोनि.तुषार मधुकर देवरे, दिपक गायकवाड तसेच चौधरी नामक कर्मचारी जाणीव पुर्वक दुर्लक्ष करत असून अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याची माहिती प्रभुलाल मांडोळे, रिता मांडोळे या दाम्पत्याने पत्रकार परिषदेत दिली.

प्रभुलाल मांडोळे यांनी माहिती देतांना सांगतले की, ऐंजल मेडिसीन हाऊस नावाचे घाऊक औषधी विक्रीचे दुकानासह ब्युटी पार्लरचा व्यावसाय आहे. परिसरातील नागरिकांच्या छळामुळे ब्युटी पार्लर व्यवसाय दुसरीकडे हलविण्यात आला. घराच्या प्रांगणातील महादेव मंदिराच्या अवारात कचरा, मांसाचे तुकडे टाकणे, अश्लिल **(पान ४ वर)**

नवापूरमध्ये रस्त्यालगच्या ठेलागाड्या, भाजीविक्रेत्यांना पालिकेने हटविले

नवापूर, दि.४ (प्रतिनिधी)- वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या हातगाड्या तसेच रस्त्यालगत भाजीपाला विक्री करणाऱ्यांना नवापूर नगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने पोलीस बंदोबस्तात हटविले. यामुळे रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे.

नवापूर नगरपालिकेचे मुख्यधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी अविनाश गांगोडे यांच्या मार्गदर्शनाखाली बांधकाम विभागाने संबंधितांना सुचना देऊन हटविण्यात आले आहे. नवापूर शहरात दिवसेंदिवस वाढत्या वाहनांची संख्या पहाता त्यात हातगाडीवाले वाहनांना अडथळा करत असतात. त्यामुळे वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पालिकेने सर्व भाजीविक्रेते व हातगाडी चालकांना सूचना दिल्या आहेत. या सुचनाचे पालन केले नाही तर कायदेशीर कार्यवाही करण्याचा इशारा बांधकाम अभियंता विवेक भामरे, लिपिक कमलेश महाले यांच्या पथकाने दिले आहे. शहरातील लाईट बाजार, नगरपालिका कार्यालय समोरील भाजी विक्रीते यांना याबाबत सुचना दिल्या आहेत. शहरात आज सकाळपासून नवापूर नगरपालिकेन ही मोहीम हाती घेऊन रस्ते मोकळे केले आहेत.

टाटा मॅजिकला अपघात; एक ठार

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- शहादा शिरपुर रोडवर प्रमोद अण्णांच्या शेताजवळ जळवाट नाल्याशेजारी सार्वजनिक जागेवर ३ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास टाटा मॅजिक गाडीस मागून येणाऱ्या अशोक लेलेंड गाडीने ठोस दिल्याने झालेल्या अपघातात प्रशांत भगवान घोरपडे २३ रा.तोरखेडा हा जागीच ठार झाला तर सात शाळकरी विद्यार्थी जख्मी झाले.यात जखमीत करुणेश प्रकाश पाटील ९, हितेश पंकज चौधरी ९, कशिश दिनेश कुंभार ९, हर्षल दिनेश वाडिले १२, हर्ष दिपक कुंभार १०, यश दिनेश आभाळे ११ तसेच उन्नती **(पान ४ वर)**

सातपुड्यात लागले होळीचे वेध गाव पाड्यात जय्यत तयारी सुरु

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी) - येत्या तेरा मे रोजी होळी असल्याने सातपुडावासीय तयारीला लागले आहेत.

सातपुड्यात काठी येथील राजावाडी होळी प्रसिद्ध आहे. होळी साजरी करण्यासाठी महाराष्ट्र गुजरात तसेच मध्य प्रदेशातून मोठ्या प्रमाणावर आदिवासी बांधव उपस्थित राहतात. जिल्ह्यातील राजकीय पदाधिकारीं पासुन शासकीय अधिकाऱ्यांची, सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांची हजेरी असते. आदिवासी बांधव पारंपारिक होळीची पाळणी (नियम) करतात, नवस करणारे, होळी साजरी करण्यासाठी पारंपारिक नियमांचे पालन करणाऱ्या विशिष्ट पारंपारिक वेश परिधान करून मोरखी, बावा, बावा बुध्या, धानका, डोखा हे फेर धरून नाचतात. या होळी परंपेनुसार चालत आलेल्या मानाप्रमाणे राज घराण्यातील वारसांच्या हस्ते होळीचे पुजन करुन पेटवली जाते. पारंपरिक कलेतून साजरी होते होळी मोरखी, बावा. बावा बुध्या, धानका, डोखा हे पाच दिवस व्रत पाळतात, यांत डोक्यावर मोरपिसांचा मुकुट धारण करून नृत्य करणाऱ्यांची संख्या लक्षणीय असते, मोरखी बनणा-यांसाठी लागणारी बनवायला सुरुवात झाली असून, ज्यांना हवी असेल त्यांना नोंदणी करण्याचे आवाहन बाज्या वसावे यांनी केले आहे.

भावानेच बहिणीवर केला अत्याचार

शिंदखेडा, दि.४ (प्रतिनिधी)- भावानेच बहिणीवर अत्याचाराची केल्याची संतापजनक घटना शिंदखेडा शहर हद्दीतील जनतानगर येथे घडली असून बहिण-भावाच्या नात्यालाच काळीमा फासला आहे. दि.२५ फेब्रुवारी रोजी दुपारी दोनच्या सुमारास सदर घटनेतील आरोपी अशोक सुक्राम दाभाडे रा.हिंगणी ता.शहादा जि.नंदुरबार सध्या रा.जनतानगर शिंदखेडा याने त्याची बहीण घरात एकटी असताना तिच्यावर अत्याचार केला व कोणाला सांगितले तर तुझ्या मोठ्या मुलास मारून टाकील अशी धमकी दिली. यासंदर्भात शिंदखेडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपास-सपोनि/गायकवाड करत आहेत.

मनपा अधिकाऱ्यांनी रस्ता कामात तीन कोटी रुपये हडपले : गोटे

धुळे, दि.४-शहरातील रस्त्याच्या कामासाठी लागणारे मुरूम, खडी केवळ कागदोपत्री खर्चात दाखवून धुळे महा पालिकेतील अधिकाऱ्यांनी तीन कोटी रूपये हडप केला आहे. यासंदर्भात पोलीस अधिकारी व वन विभागाकडे तक्रार केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्यात यावी. अन्यथा सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा इशारा माजी आ. अनिल गोटे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

पत्रकार परिषदेत माहिती देतांना मा.आ.गोटेंनी सांगितले की, नगाव बारी लगत सरकारी गोडाऊन ते धुळे बिलाडी रस्त्याला जोडण्याच्या नावा खाली मनपाने एक कोटी एकसष्ट लाख रूपये तिजोरीतून हडप केले आहेत. हद्दवाढी नंतर काही गावांना जोडण्याकरता खडी मुरूमाच्या रस्त्यापोटी या शिवाय दीड कोटी खर्ची टाकण्यात आले आहेत. धुळे शहराच्या विकासाच्या आराखड्यात जुना आग्रा रोड ते धुळे बिलाडी रस्ता हा अंदाजे अडीच कि.मी. लांबीचा व तीस मीटर म्हणजे शंभर फूट रूंदीचा रस्ता दर्शविण्यात आला आहे. हा रस्ता करावयाचा असल्यास वन विभागाच्या सर्वे नं.देवपूर ४६ व १३४ या वनविभागाच्या ताबे उपभोगातील असलेल्या जमिनीतून करणे आवश्यक होते व आहे. सदर रस्त्याकरीता एकुण पाच हेक्टर चाळीस आर एवढे क्षेत्र वनखात्याकडून मिळविणे आवश्यक होते.

वनखात्याचे एक हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र हवे असेल तर वन खात्याच्या भोपाळ व दिल्ली येथील कार्यालयाकडे मागणी करणे आवश्यक होते. मनपाने वनखात्याची **(पान ४ वर)**

सफाई कामगारांच्या मागण्यांसाठी धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा

धुळे, दि.४- सफाई काम गारांच्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या मागण्या तात्काळ पूर्ण करण्यात याव्यात. पंधरा दिवसांच्या आत मागण्यांची पूर्तता न झाल्यास तीन दिवसीय धरणे आंदोलन करण्याचा इशारा संघर्षवादी सफाई कामगार संघटना, धुळेच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

कामगारांच्या मागण्यांमध्ये सफाई कामगारांच्या विविध मागण्यांमध्ये सफाई कामगारांच्या वारसास तीस दिवसात नियुक्ती द्यावी, सफाई कामगारांच्या अपत्यांना मानधन तत्वावर नोकरी देणे, वाढीव उपदानाची व सातव्या वेतन आयोगाची रक्कम त्वरीत देणे, ॲडव्हान्समध्ये वाढ करणे, सफाई कामगारांना त्यांच्या सुरक्षेसाठी साडी, गणवेश, स्वेटर, मफलर, चप्पल, बुट, गमबुट, पाट्या, झाडू, गटरपावडी त्वरीत देणे. आदिंचा समावेश आहे. निवेदन देतांना संघर्षवादी सफाई कामगार संघटनेचे मुनाफ शेख कादर, बापू खरात, कुणाल बोरसे, किशोर मोरे, मोहन शिंदे, वसीम शेख, अशोक खैरनार, शमशेर बेग आसीफ बेग, सलीम बेग यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शासकीय कामात अडथळा; गुन्हा दाखल

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- वाळूचे ट्रक अडविण्याचा प्रयत्न महसुलच्या भरारी पथकाने केला असता अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या चालकाने हुज्जत घालीत शिवीगाळ केल्याने ट्रॅक्टर क्रमांक जीजे २६ एई ३४९६ च्या चालकाविरोधात ग्राम महसुल अधिकारी प्रशांत जयंत वळवी यांनी नवापूर पोलिसांत फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवापूर तालुक्यातील आमलाण गावाच्या चौफलीजवळ अवैध वाळू वाहन चालकास परवान्याची विचारणा करीत गाडी बाजूला घ्या, याचा राग येवून चालकाने हूज्त घातली. तसेच शिवीगाळ केली. अंगावर ट्रॅक्टर घालीन अशी धमकी देण्यात आली. यामुळे वाळू चोरट्यांची मुजोरी पुन्हा चव्हाट्यावर आली आहे.

गुड्ड्या खून प्रकरण; पंच साक्षीदारांचा तीन दिवस चालला उलट तपास

धुळे, दि.४- पारोळा रोड कराचीवाला खुंट गोपाल टी येथे गुड्डया ऊर्फ रफीयोद्दीन शफीयोद्दीन शेख याचा राजेंद्र ऊर्फ भद्रा, विलास गोयर, विक्रम गोयर आदि एकुण एकोणावीस जणांनी कट रचून पुर्ववैमनस्यातून तलवारी, कोयता, लोखंडी रॉड, बंदुक आदिंचा वापर करून हत्या केली होती. तपासाअंती संघटीत गुन्हेगारी कायदा अर्थात मोक्का अंतर्गत न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. गुड्डया खुन खटल्यातील पंच साक्षीदार यांचा तब्बल तीन दिवस उलट तपास दि.४ मार्च २०२५ रोजी पूर्ण केला.

गुड्डया खुन प्रकरणाचे सी.सी. टी.व्ही.फुटेज देशभरात व्हायरल झाले. या खून खटल्याची सुनावणीची सुरूवात नुकतीच झालेली असून सरकार पक्षातर्फे पंच साक्षीदार चंद्रकांत रवींद्र इथापे यांचा सरतपास जिल्हा सरकारी वकील ॲड.देवेंद्रसिंह योगेंद्रसिंह तवर यांच्यातर्फे नोंदविण्यात आला. दि.१८ फेब्रुवारी २०२५ रोजी आरोपी गणेश बिवाल यांच्या तर्फे विधीज्ञ तुकाराम मासुळे यांनी साक्षीदारांचा तब्बल दोन तास उलट तपास घेतला. त्यानंतर दि.३ मार्च २०२५ रोजी आरोपी क्र.१, **(पान ४ वर)**

अनोळखी मयत इसमाची माहिती देण्याचे आवाहन

धुळे, दि.४- आझादनगर पोलीस स्टेशन हद्दीतील पांझरा नदीवरील मोठ्या पुलाखाली कमानीजवळ बेशुद्ध अवस्थेत अनोळखी पुरुष इसम मिळुन आल्याने त्यास हिरे मेडिकल कॉलेज, धुळे येथे उपचारासाठी पाठविले असता ४ एप्रिल,२०२३ रोजी रात्री ८ वाजता त्यास मयत घोषित करण्यात आले असून आझाद नगर पोलीस ठाणे, धुळे येथे रजि नंबर ९/२०२४ सीआरपीसी १७४ प्रमाणे अकस्मात मृत्यू नोंद दाखल झाली आहे. सदर मयत इसम बेवारस असुन मयताच्या नातेवाईकांचा शोध होणेकामी नागरिकांनी माहिती देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मयत **(पान ४ वर)**

धुळ्यात भाजपकडून अबू आझमींच्या पुतळ्याचे दहन

धुळे, दि.४- छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वावर शंका उपस्थित करून औरंगजेब सारख्या क्रुर व धर्मांध प्रवृत्तीबद्दल गौरवोद्गार काढणाऱ्या समाजवादी पार्टीच्या अबु आझमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. या मागणीचे निवेदन भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी आझाद नगर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरिक्षकांना दिले आहे.

सपाचे अबु आझम ींनी महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील हिंदू नागरिकांचा अवमान करून कमकुवत बुध्दीचे प्रदर्शन केले. इतिहासाचा अभ्यास न करता छत्रपती संभाजी महाराजांचा चाळीस दिवस छळ करून क्रुरपणे हत्या करणाऱ्या औरंगजेबची स्तुती केली. औरंगजेब क्रुरतेचे प्रतिक आहे. अशा क्रुर व्यक्तीबद्दल महाराष्ट्रात राहून कौतुकाची भुमिका घेणे चुकीचे आहे. जातीय तेढ निर्माण करणाऱ्या अबु आझमीवर तत्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा भाजपाचे बबन चौधरी, दिनेश बागुल, महेंद्र शेणगे, रजनिश निंबाळकर, शरद चौधरी, विनायक अहिरे, अनिल थोरात, अमृत चौधरी, विनोद खेमनार, पंकज धात्रक, कार्तिक मराठे यांनी दिला आहे.

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- जन्मभूमी नंदुरबार आणि कर्मभूमी मुल्हेर (जि.नाशिक) येथील विवेक संजय सोनवणे या विद्यार्थ्याने बिमस्टेकमध्ये भारताचा तिरंगा झेंडा रोवला.

नंदुरबार येथील अमृत चौकातील श्री रामदूत हनुमान मित्र मंडळाचे जेष्ठ सल्लागार रामदास दगडू जाधव (चौधरी) यांचा नातू आणि सौ.अश्विनी संजय सोनवणे व प्रा.संजय सोनवणे या दाम्पत्यांचा चिरंजीव विवेक सोनवणे याने यशस्वी नेतृत्व केले. भारत सरकारचे परराष्ट्र मंत्रालय आणि स्काऊट गाईडतर्फे नुकत्याच झालेल्या पाच दिवसीय बिमस्टेक शिखर परिषदेत विवेक सोनवणे याने भारताचे यशस्वी नेतृत्व केले. नवी दिल्लीतील डिप्लोमॅटिक इनक्लेव्ह मधील विश्व युवक केंद्रात झालेल्या शिखर परिषदेत सौर ऊर्जा आणि प्राचीन भारत या विषयावर विवेक सोनवणे याने पेपर प्रेझेंटेशन केले.

भारतासह म्यानमार, थायलंड, भूतान, नेपाळ आणि बांगलादेशच्या देशातील विद्यार्थी प्रतिनिधींनी या परिषदेत सहभाग घेतला होता. बिमस्टेक (बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह ऑफ मल्टी सेक्टरल टेक्निकल ॲंड इकॉनोमिक को ऑपरेशन) ही बंगालच्या उपसागर देशातील एक प्रादेशिक संघटना आहे. भारत, नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका, म्यानमार थायलंड हे त्या संघटनेचे सदस्य देश आहेत. या संघटनेचा उद्देश सदस्य राष्ट्रांमधील तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य वाढवणे हा आहे. या परिषदेचा मुख्य विषय हवामान बदल हा होता. विवेक सोनवणे हा मुल्हेरचा रहिवासी असून सध्या पुण्यात आयएसएल विधी महाविद्यालयात वकिलीचे शिक्षण घेत आहे. त्याने एचपीटी महाविद्यालयातून पॉलिटिकल सायन्सची पदवी घेतली आहे. त्याचे वडील संजय सोनवणे नाशिक जिल्ह्यातील डांग सेवा मंडळ या संस्थेत प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. तर आई सौ.अश्विनी **(पान ४ वर)**

बिमस्टेक शिखर परिषदेत विवेक सोनवणेने केले भारताचे नेतृत्व

०४ रोजा ०५

५ मार्च २४	६ मार्च २४
इफ्तार	सहेरी
६.३९	५.२८

दिपक ज्वेलर्स

सोने- 22 K -79,500 रु.+3% GST
सोने- 24 K -86,800 रु.+3% GST
चांदी- 99,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

आपला महाराष्ट्र

महाराष्ट्रात उशिरा सुचलेले शहाणपण

व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण न्यूज इन द लाईनच्या माध्यमातून व्यंगचित्राद्वारे आजूबाजूला घडणाऱ्या घटनांवर अचूक भाष्य करीत असत. घटना घडलेली असो वा घडणारी असो आर के लक्ष्मण यांचा कुंचला प्रभावीपणे भाष्य करीत असे. सोबत कॉमन मॅन अर्थात सामान्य माणूस असायचाच. सध्या असे कोणी नाही की ज्यांच्या लेखणीमुळे किंवा कुंचल्यामुळे राजकीय सामाजिक क्षेत्रातील अघटीत अशा मुद्द्यांवर प्रकाश टाकला जाईल. आणि त्यानुसार व्यवस्था सावध होईल. काहीतरी कारवाई करेल. काल महाराष्ट्र राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. गेल्या दोन महिन्यांपासून मुंडे हे राजकीय क्षेत्रात चर्चेचा विषय बनले होते. समाजात वावरणाऱ्या आणि नैतिकतेने समृद्ध असलेल्या लोकांना सतत असे वाटत होते की मुंडे यांनी राजीनामा द्यावा पण लोकांची नैतिकता किंवा त्यातील समृद्धी काही उपयोगाची नव्हती. कारण त्यासंबंधी काहीही हालचाली होत नव्हत्या. मीडिया मुंडे यांच्या पक्षाच्या नेत्यांना या संदर्भात संधी मिळाली की प्रश्न विचारीत असत. पक्षाचे नेते एक तर टोलवाटोलवीची उत्तरे देत असत किंवा आरोप सिद्ध होईपर्यंत कारवाई करणे बरोबर होणार नाही असे सांगत असत. थोडक्यात धनंजय मुंडे यांच्या कारवायांवर पांघरूण घातले जात होते. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी दोन-तीन वेळा पत्रकार परिषद घेऊन जाहीरपणे मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. मुंडे यांच्या वर असलेल्या आरोपांचा वारंवार पाढा वाचला होता. दमानिया यांचे निवेदन मीडियाने प्रसिद्ध केले. मुद्रित माध्यमे आणि दृकश्राव्य माध्यमे या दोन्ही माध्यमातून मुंडे यांची भरपूर बदनामी झाली त्यातून त्यांना प्रसिद्धी देखील मिळाली. मध्यंतरी मुंबईच्या एका न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या पूर्व पत्नी करुणा मुंडे यांच्या बाजूने त्यांच्या छळ प्रकरणी अंतरीम निकाल दिला होता. आणि करुणा मुंडे यांना बऱ्यापैकी रक्कम अदा करण्याचे आदेशही या न्यायालयाने दिले होते. त्यावर मुंडे यांच्या चिरंजीवांनी आपल्या वडिलांची बाजू घेत त्यांच्या संरक्षणार्थ धाव घेतली आणि आपल्या आईनेच आपल्या वडिलांचा छळ केला असे सांगितले. या प्रकरणाचा देखील परिणाम मुंडे यांच्यावर झालेला नव्हता. अंजली दमानिया असतील, विरोधी पक्षातील नेते असतील, सत्तेतील पक्षांचे नेते असतील किंवा त्यांच्यातील अंतर्गत कुरबुरी असतील मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत चा दबाव सारखा वाढत होता. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यात या प्रकरणासंबंधीचा संवाद नेमका काय चालू होता तो तपशील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला नाही परंतु काही लोकांना या तपशिलाची माहिती होती आणि ते असे म्हणत होते की आज ना उद्या धनंजय मुंडे यांना राम म्हणावा लागेल. तसे घडले. एकेकाळी एकमेकातून विस्तव देखील न जाणाऱ्या भगिनी आणि बंधू निवडणुकीत एकत्र आले. भगिनींनी सरपंच संतोष देशमुख हा आपला कार्यकर्ता होता एवढेच निवेदन केलेले होते. त्या त्यापेक्षा अधिक काही या संबंधी बोलल्या नाहीत. मात्र परवा मुंबईतील मोठ्या वृत्तपत्राच्या कार्यक्रमात त्यांनी बीड मधील संतोष देशमुख यांच्या हत्येचा मुद्दा चर्चेतून अधोरेखित केला आणि ती घटना अनैतिक असल्याचे भाष्य केले. त्यातूनही असा संदेश बाहेर आला की, धनंजय मुंडे यांना सरकार संरक्षण देणार नाही. शासक पक्षातील मुख्य राजकीय पक्ष आणि त्या पक्षाचे नेते यांनी या प्रकरणी फारसे भाष्य केले नसले तरी घटक पक्षाच्या नेत्यांसोबत त्यांचे बोलणे सातत्याने चालू असावे. त्याचाच परिपाक म्हणजे धनंजय मुंडे यांनी दिलेला राजीनामा होय. परवा आणखी एका कॅबिनेट मंत्र्याच्या संदर्भात एका चॅनेलमधून एक बातमी सतत प्रसारित होत होती. त्या मंत्र्याला मुख्यमंत्र्यांच्या बंगल्या बाहेर थांबावे लागले आणि परत जावे लागले. त्यांना भेट मिळाली नाही. नुकताच एक त्या मंत्र्याने घेतलेला निर्णय मुख्यमंत्र्यांनी रद्द करावा परिणामी ते मंत्रिमहोदय अडचणीत आले त्यांच्या संबंधित देखील निरनिराळ्या तपशिलाच्या बातम्या येऊ लागल्या. दरम्यान त्यांच्या मुलाच्या बँकॉक प्रवासाची बातमी देखील गाजली. त्यामुळे त्यांची गच्छंती होणार अशी अटकळ बांधली गेली. धनंजय मुंडे यांच्यानंतर त्यांचा क्रमांक लागू शकतो. आणखी एका प्रकरणात कॅबिनेट मंत्री जिल्हा न्यायालयाने दोषी ठरविल्यामुळे आणि त्यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आल्यामुळे त्यांची ही गच्छंती अपरिहार्य असल्याचे मानले जाते. मात्र मुख्यमंत्र्यांनी यावर नुकतीच एक प्रतिक्रिया व्यक्त केली असून न्यायालयाच्या निर्णयानंतर या मंत्राच्या पदाबाबतचा निर्णय घेतला जाईल असे त्यांनी नमूद केलेले आहे. विशेष म्हणजे हे सगळे मंत्री घटक पक्षांचे आहेत. मुख्यमंत्र्यांना जरी त्यांना काढण्याचा किंवा त्यांनी राजीनामा द्यावा असे सांगण्याचा अधिकार असला तरी युतीमुळे ते शक्य होत नाही. त्याबाबतचा निर्णय त्या त्या पक्षाने घेतला पाहिजे अशी अपेक्षा असावी. घटक पक्षाचे नेते त्याबाबत काही बोलत नाहीत. मीडियाने मल्लिनाथी केलीच तर टाळाटाळ करतात अशी परिस्थिती असल्याने मुख्यमंत्र्यांची पंचाईत होते आणि त्यांना उत्तर देण्याची कसरत करावी लागते. सहकारी घटक पक्षांना सांभाळण्याची अपरिहार्यता यातून स्पष्ट होते.

धनंजय मुंडे यांच्या भगिनी आणि कॅबिनेट मिनिस्टर पंकजा मुंडे यांनी काल प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत म्हटलेले आहे की धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला त्याचे स्वागत आहे. परंतु हा राजीनामा आधीच घ्यायला पाहिजे होता. खरं म्हणजे त्यांचा शपथविधीच नको व्हायला होता. शपथविधी झाला नसता तर गेल्या दोन महिन्यांपासून जो मनस्ताप सहन करावा लागला तो करावा लागला नसता. पंकजा मुंडे यांची ही प्रतिक्रिया फारच बोलकी म्हणाली लागेल. शिवाय त्यांनी जे काही परवा वृत्तपत्राच्या संवाद कार्यक्रमात सांगितले ते अतिशय महत्त्वाचे होते. केंद्रीय मंत्र्यांच्या मुलीची छेड, शिवशाही बस मधील अत्याचार, संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर एकाच समाजाला लक्ष करण्याची प्रवृत्ती, एका मागून एक अशा अत्याचाराच्या घटना यामुळे तरुणांच्या मनात कायद्याचा किंवा सरकारचा धाक राहिलेला नाही. तो असला पाहिजे. या सगळ्या घटना बघून आणि ऐकून मन विषन्न होते असे त्यांचे म्हणणे आहे. त्या शासनात आहेत. त्यांचा पक्ष मुख्य शासक पक्ष आहे. मग त्यांना कायदा आणि सुव्यवस्था चोख ठेवायला कोणी थांबविले आहे? नुसते दुःख किंवा खंत व्यक्त करून चालणार नाही. सामान्य माणसाने अशा प्रकारचे दुःख व्यक्त केले तर आपण समजू शकतो पण खुद्द मंत्री उद्विग्न होतात याचा अर्थ प्रशासनावर सरकारची पकड राहिलेली नाही. नुसतेच अमुक चालणार नाही, तमुक खपवून घेणार नाही, अत्याचाराच्या घटना सरकार सहन करणार नाही, गुन्हेगारांना सोडणार नाही एवढे बोलून मुद्दा संपत नाही. तर तो कृतीत आणावा लागतो. मात्र तसे घडत नाही. गुन्हेगारांना मोकळे रान असते. त्याला राजकीय संरक्षण असते. हे अलीकडे घडलेल्या अनेक घटनांवरून स्पष्ट झालेले आहे. गेल्या दोन महिन्यांपासून धनंजय मुंडे वादग्रस्त झालेले असताना त्यांचा ज्या वाल्मीक कराडशी संबंध आहे. तो संबंध आजही कायम असल्याचे म्हटले जाते. याचाच अर्थ मंत्र्यांचे गुंडांशी असलेले किंवा खंडणीखोरांशी असलेले संबंध स्पष्ट होतात. परवा विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होण्या पूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित असताना त्यांनी आमच्यात मतभेद नसल्याचे सांगितले. याचाच अर्थ असा आहे की, मतभेद आहेत. ते दिसून पडतात आणि त्यासंबंधीचे खुलासे करावे लागतात. घटक पक्षांशी संबंधित असलेले (पान ३ वर)

युवा सैनिकांनी कॉमन मॅन म्हणून काम करावे : सरनाईक

नंदुरबारात युवा सेनेचा मेळावा; पदाधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- शिवसेनेच्या प्रचार-प्रसार व सरकारच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी युवा सेनेची राज्यात १० पथकं तयार करण्यात आली आहेत. जनतेसाठी युवा सैनिकांनी कॉमन मॅन म्हणून काम करावं असा मोलाच्या सल्ला शिंदे गटाच्या युवा सेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

सध्या राज्यभरात शिवसेना शिंदे गटाच्या 'युवा विजय महाराष्ट्र दौरा' सुरू असून, शहरात छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिरात रविवारी दुपारी युवा सैनिकांच्या मेळावा घेण्यात आला. यावेळी राज्य कार्याध्यक्ष पूर्वेश प्रताप सरनाईक यांनी उपस्थित युवकांना मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, ग्रामीण भागासह तळागाळातील जनतेची कामे करून देणे हे प्रत्येक शिवसैनिकाच काम आहे. जिल्ह्यात शिवसेनेचे काम चांगलं सुरू असून, शिवसेनेच्या ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांमुळे

युवा सैनिकांमध्ये ताकद निर्माण होत आहे. गेल्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र घडवायचे काम केले. शिवसेना अधिकाधिक भक्कम करण्यासाठी शिवसैनिकांनी प्रयत्न करावेत. जनतेसाठी शिवसैनिकांनी कॉमन मॅन म्हणून काम केलं पाहिजे. प्रास्ताविक जिल्हाप्रमुख ॲड.राम रघुवंशी यांनी केले.

संपर्कप्रमुख तथा माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी म्हणाले आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या मुद्द्यावर हात घातला. युवा सेनेच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षाचं काम उभारीने करावं. प्रत्येकाने आपापली गाव सांभाळलं पाहिजे. विरोधकांचे उमेदवार ठरले गेले असतील त्याची चिंता शिवसैनिकांची करायची नाही.

आ.आमश्या पाडवी म्हणाले, आगामी काळात नगरपालिका, जिल्हा परिषद,ग्रामपंचायत त्याचप्रमाणे विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात येतील. या निवडणुकांमध्ये शिवसैनिकांनी आपल्या पक्षाची ताकद दाखवायची आहे.युवा सेना मुख्य सचिव राहुल लोंढे म्हणाले, नंदुरबारला लागून असलेल्या गुजरात व मध्ये प्रदेश सीमेलगत देखील शिवसैनिकांनी शिवसेनेचे कार्य त्या ठिकाणी पोचवले पाहिजे. धाव पातळीवर संघटना वाढवण्याचे काम शिवसैनिकांनी करावे.

यावेळी राज्य सचिव किरण साळी, सचिव, राज्य अविष्कार भुसे, युवासेना विद्यापीठ व कॉलेज कक्ष निरीक्षक प्रथमेश पाटील, राज्य सदस्य किशोर भोसले, राज्य सदस्य निखिल चौधरी, युवती सेना राज्य सदस्य योगिता ठाकरे, श्वेता सुयोग, जि.प माजी अध्यक्ष वकील पाटील, माजी नगरसेवक किरण रघुवंशी, यशवर्धन, कुणाल वसावे रघुवंशी, धडगाव अक्कलकुवा विभाग युवासेना जिल्हाप्रमुख योगेश पाटील, नंदुरबार विभाग युवा सेना प्रमुख प्रेम सोनार, जिल्हा समन्वयक दीपक मराठे, जिल्हा संघटक विजय पाडवी, तालुकाप्रमुख राजेश वसावे, जिल्हा संघटक कमलेश महाले, महानगरप्रमुख बंटी सूळ, उपजिल्हा संघटक चंद्रकांत पाटील, युती सेना जिल्हाप्रमुख राजश्री मराठे, नितीन नागरे, मोहित राजपूत, प्रतीक पटेल, अजय नाईक, दुर्गेश शिरसाठ, विशाल पाटील प्रफुल्ल खैरनार, पं.स माजी उपसभापती प्रल्हाद राठोड, संतोष साबळे, बाजार समिती संचालक किशोर पाटील आदी उपस्थित होते.

भोरटेक गावात आढळले बोगस मतदार

शिरपूर दि.४ (का.प्र.)- ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीनंतर चौकशी करतांना प्रशासनाला तब्बल ३१ बोगस मतदार आढळल्याची खळबळजनक घटना शिरपूर तालुक्यातील भोरटेक गावात घडली आहे. शिरपूरचे प्रांताधिकारी शरद मंडलिक यांनी या प्रकाराची माहिती दिली असून त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव देऊन मतदार यादीतील बोगस मतदारांची नावे वगळण्यास मान्यता देण्याची मागणी केली आहे.

२०२४ मध्ये शिरपूर विधानसभा मतदार संघाची यादी प्रकाशित करण्यात आली. तिचे अवलोकन केल्यानंतर यादीच्या भाग क्रमांक २९५ व २९६ मध्ये समाविष्ट नावांवर ग्रामस्थ गंगाधर धारे, भुलेश्वर गोड, जगन कोही, परिहार पाटील, भूषण जाधव, रणछोड पाटील यांनी हरकत घेतली. गावाचे तत्कालीन सरपंच, ग्रामसेवक, स्वस्त धान्य दुकानदार यांनी संगनमत करुन संबंधितांचे रेशन कार्ड बनवून घेतले. त्यानंतर जळगाव जिल्ह्यातील गोरगावले खुर्द, पाडळसे, निम, लोहारा व वरळी येथील रहिवाशांचे नाव मतदार यादीत टाकून घेतले असे तक्रारीत नमूद केले होते. या तक्रारीची चौकशी करण्यासाठ तहसीलदार महेंद्र माळी भोरटेक गावी गेले. त्यांनी तलाठी व बीएलओंसोबत केलेल्या पाहणीत बोगस मतदारांची नावे समाविष्ट असून त्यांच्या आधार कार्डवर पत्ता मात्र जळगाव जिल्ह्याचा असल्याचे दिसून आले. त्यामुळे बोगस मतदारांचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांची नावे मतदार यादीतून कमी करण्यास मान्यता द्यावी अशी मागणी शरद मंडलिक यांनी प्रस्तावात केली आहे. या घटनेमुळे राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली असून ग्रामपंचायतीच्या मतदानासाठी पदाधिकारी कोणत्या थराला जाऊ शकतात हेच दिसून येत असल्याची प्रतिक्रिया दिली जात आहे.

टीम इंडियाची थेट फायनलमध्ये धडक

(पान १ वरुन) धावांची, अक्षर पटेलच्या साथीने ४४ धावांची आणि लोकेश राहुलच्या साथीने ४७ धावांची भागीदारी रचून भारताला विजयाच्या दिशेने नेले. विराट कोहलीने ८४, श्रेयस अय्यरने ४५, अक्षरने २७ धावांची आणि राहुलने ४२ नाबाद धावांची खेळी उभारली. तत्पूर्वी, दुबईच्या मैदानात टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाच्या आघाडीच्या फळीला शमीसह भारतीय फिरकीने काही प्रमाणात जखडून ठेवले. सलामीवीर ट्रेव्हिस हेडच्या ३३ चेंडूंमधील आक्रमक ३९ धावांनंतर कांगारुंना भारताने वेसण घातली होती. मग स्टीव्ह स्मिथ ९६ चेंडूंमध्ये ७३ संयमी तर ॲलेक्स कॅरीने ५७ चेंडूंमध्ये ६१ धावांची आक्रमक खेळी करत संघाला अडीचशे पार पोहोचवले. भारताकडून शमीने तीन तर वरुण चक्रवर्ती आणि डावखुरा स्पिनर रवींद्र जडेजाने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. ऑस्ट्रेलियाचा डाव ४९.३ षटकांत २६४ वर आटोपला. विराट कोहलीच्या शानदार खेळीच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियाला हरवून चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

कलमाडीतील अगस्तमुनी विद्यालयात विद्यार्थीनींना सायकल वाटप

सोनगीर दि.४ (प्रतिनिधी)- कलमाडी ता.शिंदखेडा येथील अगस्तमुनी माध्यमिक विद्यालयात मानव विकास मिशन अंतर्गत इयत्ता आठवीतील सोळा मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले.

यावेळी माजी शिक्षण व आरोग्य सभापती जिल्हा परिषद धुळे, सोनाली पंकज कदम, माजी जि.प. सदस्य पंकज कदम, गटशिक्षणाधिकारी डॉ.सी.के. पाटील, गोजरबाई मालचे, विजेंद्र झालसे उपसरपंच कलमाडी, जे.बी. पाटील संस्थापक अध्यक्ष, प्रमोद पाटील, रोहिदास पाटील, मुख्याध्यापक एस.ए. कदम तसेच पालक आदी उपस्थित होते.

जाहीर नोटीस निशाणी नं.६

शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज साो.ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं. २५६/२०२५

१) **किशोर बिजयसिंग गिरासे,** रा. वाठोडे ता. शिरपूर जि. धुळे. ह. मु. रा. ७ श्रेयस रेसीडेंसी, न्यू ईरा शाळे जवळ, गोंविद नगर, नाशिक सिडको ता. जि. नाशिक

२) **सौ. विद्या राजेंद्र पाटील,** रा. ४०२, प्लॉट नं १८, हरी आशिर्वाद को.ऑप सोसायटी न्यू पनवेल ईस्ट जि.रायगड ... **अर्जदार**

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार **किशोर बिजयसिंग गिरासे** वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे अर्जदार नं. १ व २ यांचे वडील मयत नं. १ विजयसिंग नागोसिंग गिरासे हे दि. २१/०४/१९९२ रोजी मौजे उपचारादरम्यान कुटीर रुग्णालय शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं. १ व २ यांची आई मयत नं. २ विमल विजयसिंग गिरासे ह्या दि. १०/११/२०२३ रोजी मौजे उपचारादरम्यान नवकार हॉस्पिटल नाशिक ता. जि. नाशिक येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे मयत नं. १ विजयसिंग नागोसिंग गिरासे व मयत नं. २ विमल विजयसिंग गिरासे यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. २६/३/२०२५ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन

सही/- सही/-

कनिष्ठ लिपिक (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**

दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय शिरपूर

जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे, पैकी मौजे देवपूर येथील स.नं. ४८ पैकी प्लॉट नं. ७१ यास वि. सि. स. नं. २९१७ चे क्षेत्र ४६७.५० चौ. मी. चा बखळ प्लॉट या पैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र १६८० चौ. फुट चा बखळ प्लॉट यांसी चतुःसिमा पुर्वेस : ३० फुटी रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ७०, उत्तरेस : याच प्लॉट चा उर्वरीत भाग, दक्षिणेस : ४० फुटी रस्ता, येणे प्रमाणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट हा सौ. विणा भास्कर थोरात रा. एच. ७०३, उषा कॉम्प्लेक्स, खंडेलवाल मार्ग, उषा नगर जवळ भांडुप (वेस्ट) मुंबई यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे बखळ प्लॉट हे आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून व्याना सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर बखळ प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहाराबाबत हरकत असल्यास, बखळ प्लॉट वर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर बखळ प्लॉट संबंधी कोणत्याही प्रकारचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती, विक्री पावती, खरेदीखत करुन दिलेले असल्यास असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ (पाच) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर बखळ प्लॉट निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहू बखळ प्लॉटचा व्यवहार करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या अशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. स्थळ - धुळे, दि. ०३/०३/२०२५

ॲड.अनिल सुरेश अग्रवाल

ग. नं. ४ भांडी बाजार, कांती कॉम्पलेक्स शेजारी, धुळे

मो. नं. ७७०९७७२७५७/७५८८८८४१०७

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज साो. (ज्यु.डी.) यांचे कोर्टात

नि.६/ड, दि.कि.अर्ज नं.२५२/२०२५

१) नगीबाई तेरसिंग पावरा,
२) सुरेश तेरसिंग पावरा,
दोन्ही रा.बोमल्यापाडा, पो.रोहिणी,
ता.शिरपूर, जि.धुळे ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी मयत तेरसिंग सोनू पावरा हे दि.१०/१२/२०२४ रोजी मौजे- बोमल्यापाडा, पो.रोहिणी, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले असून, अर्जदार नं.१ व २ यांना शासकीय व निम-शासकीय कामांसाठी व अर्जदार नं.१ व २ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसा संबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आतं दि.१/४/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होऊन हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल.

दि.२७/०२/२०२५

कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**

दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे **दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे कळमसरे तालुका शिरपूर जिल्हा धुळे शिवारातील बिनशेती सर्वे क्रमांक ९/२/ब/१ या मधील रहिवाशी बखळ प्लॉट मिळकती खालील प्रमाणे.

अ.क्र.	प्लॉट क्रमांक	क्षेत्रफळ चौरस मिटर
१	३६	१६०.०० चौरस मिटर
२	३७	१६०.०० चौरस मिटर
३	६२अ	१३५.०० चौरस मिटर
४	६२ब	१३५.०० चौरस मिटर
५	६१	१५३.७५ चौरस मिटर

तसेच मौजे कळमसरे तालुका शिरपूर जिल्हा धुळे शिवारातील बिनशेती सर्वे क्रमांक ९/२/ब/२ या मधील रहिवाशी बखळ प्लॉट मिळकत प्लॉट क्रमांक ९ यांचे क्षेत्रफळ १७०.०० चौ.मी.

वरनमूद प्लॉट मिळकती अरुण पितांबर पाटील यांच्या नावे मालकी हक्काने असून, त्यांच्या ताबे उपभोगातील प्लॉट मिळकती आहेत.

आमचे अशिल विलास सुभाष पाटील यांनी कायमस्वरूपी मालकी हक्काने वरनमूद प्लॉट मिळकती विकत घेण्याचा सौदा केलेला असून नोंदणीकृत खरेदीखताचा व्यवहार करणार आहेत.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणत्याही कोर्टात वाद असेल, कोणाचा गहाण, सौदा करार, खरेदी-विकी करार, टाच, बक्षीस, बोजा, लिज, मुखत्यार वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत खालील पत्यावर मिळकती संबंधित पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरच्या हरकती आमचे अशिलावर तसेच वरनमुद मिळकतींवर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्बोज समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोद घ्यावी.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगण्यावरून आमच्या मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दिनांक- ०४/०३/२०२५.

ॲड.प्रदिप युवराज राजपूत

ऑफिस- नं.४, पहिला मजला, न्यायालय समोर, न.पा.शॉपींग कॉम्प्लेक्स, शिरपूर, जि.धुळे.

मो.नं.९२८४०३०८३३, ९६३७२३१९०१

प्रकाश में आज **हत्यारा**

शेतीच्या वादातून खून

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- बिलगाव गावाच्या शिवारात उदय नदीलगत असलेल्या टेकडीच्या उतारावर २ मार्चच्या मध्यरात्री चाळीस वर्षीय फाडया खाज्या पावरा याची हत्या करण्यात आली. शेतीच्या वादातून तिघांनी संगनमत करुन जीवे ठार केल्याने खळबळ उडाली असून धडगाव पोलिसांत तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला (पान ३ वर)

जाहीर नोटीस

शिरपूर येथील म.दिवाणी न्यायाधिश साो., कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात

दि.कि. अर्ज नं.१९७/२०२५

१) आशाबाई अशोक बाविस्कर (पाटील),
२) दिनेश अशोक बाविस्कर (पाटील),
३) सुनिता अरूण पाटील, ४) साधना सुनिल पाटील,
५) मनीषा संजय पाटील, ६) रूपाली शैलेश पाटील,
सर्व रा. दामखेर पाडा, थाळनेर, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

X

अशोक लुका पाटील (बाविस्कर),
रा.दामशेरपाडा, थाळनेर, ता.शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दि.२१/०५/२००५ ..... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात मयत अशोक लुका पाटील (बाविस्कर) रा.थाळनेर ता.शिरपूर जि.धुळे हे दिनांक २१/०५/२००५ रोजी विनोबानगर लिंबायत सुरत येथे मयत झाले असून, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावायचा असल्यास त्यांनी दि.०१/०४/२०२५ रोजी ठीक सकाळी १०:३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक २१/०२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सहा. अधिक्षक (कोर्टाचा शिक्का) **कनिष्ठ लिपीक**

दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय, शिरपूर

आदि जनता विद्या प्रसारक मंडळ, शिरपूर करीता

पाहिजेत

पद	शैक्षणिक पात्रता	पदसंख्या
अधिक्षक इंदिरा गांधी विद्यार्थी वसतिगृह शिरपूर जि

महाराष्ट्रात उशिरा सुचलेले शहाणपण

(पान २ वरुन) मंत्री वादग्रस्त ठरत आहेत. त्यांच्या बाबत निर्णय घेण्याच्या मुद्द्यावर एकमत असण्याचे काहीच कारण नाही. घटक पक्षाचे नेते वादग्रस्त मंत्र्यांना वाचवण्याचा प्रयत्न करणार हे उघड आहे. मग तिघांच्या दरम्यान मधुर संबंध कसे हा प्रश्न सहज उपस्थित होतो.

विधानसभा निवडणुकीत ठरवून दिग्गज विरोधकांना सभागृहात येण्यापासून वंचित ठेवण्यात आले. तसेच विरोधकांचे संख्याबळ सुद्धा कमी आहे. इतके की त्याचा आवाज फारसा चालणार नाही अशी व्यवस्था आहे. मात्र जे काही आहेत तेच सरकारला विरोध करण्यास पुरेसे आहेत. याचा अंदाज परवाच सभागृहात सरकारला आला. मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने शिक्षा दिलेली असताना सरकारने त्यांचा राजीनामा का घेतला नाही या मुद्द्यावर विरोधक सरकारवर तुटून पडले. गोंधळ वाढला. परिणामी मुख्यमंत्र्यांना घोषणा करावी लागली की न्यायालयाचे कामकाज पूर्ण झाले आहे. निकाल लवकरच अपेक्षित आहे. जर त्यांना जामीन मिळाला नाही तर त्यांचा राजीनामा घेण्यात येईल. अशाप्रकारे संख्याबळ कमी असले तरी विरोधकांची ताकद कमी नाही हेही याच अधिवेशनात स्पष्ट झालेले आहे. डागी मंत्र्यांच्या निष्कासना संबंधीचा निर्णय भिजत ठेवणे. त्यांच्याविषयी उपस्थित झालेल्या शंका कुशंकांच्या वातावरणाला तोंड देणे. अशी सगळी कसरत सरकार का करीत आहे? या प्रश्नाला आज उत्तर नसले आणि धनंजय मुंडे यांचा राजीनामा म्हणजे उशिरा सुटलेले शहाणपण वाटत असले तरी केव्हातरी लोक लाजेस्तव का असेना पारदर्शकता दाखविण्यासाठी सरकारला त्यांचे राजीनामे घ्यावेच लागतील.

भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव कल्याण सन्मान सोहळा २०२५ मध्ये धुळे बारच्या ॲड.दिपक जोशी यांना सन्मानित करण्यात आले.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संबंधितांना तसेच सर्व राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँक, नागरी सहकारी पतसंस्था व वित्तीय संस्था यास कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे धमाणे ता. शिंदखेडा जि. धुळे येथील शेत गट नं. ८२/१ त्यांसी क्षेत्र ० हे. ६० आर. आकारणी रु. ५.१० पैसे त्यासी चतु:सिमा मंजूर गाव नकाशा प्रमाणे.

